ePaper
पुणे-बंगळुरु महामार्गावर भीषण अपघात: तीन ठार, 15 जखमी



वर्ष - 6 । अंक - 363 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- जनतेच्या मनातील मुख्यमंत्री!
- 'पीएमआरडीए'च्या मदतीला ड्रोनची 'करडी नजर'!
- अजितदादा पवारांचे तथाकथित बंड


www.mahaenews.com | रविवार दि. 23 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# वृक्षारोपण काळाची गरज!

## » आयुक्त शेखर सिंह : वसुंधरा दिनी नागरिकांना आवाहन

**।पिंपरी महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**नागरिकांनी पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आज उपलब्ध संसाधनांचा व्यवस्थित वापर करणे आवश्यक आहे व जास्तीत जास्त झाडे लावून वृक्षसंवर्धन त्याचबरोबर वृक्षारोपण करणे ही काळाची गरज आहे, असे मत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, माहिती व जनसंपर्क विभाग आणि उद्यान विभागाचे उपायुक्त रविकिरण घोडके, ई क्षेत्रीय अधिकारी राजेश आगळे, उद्यान अधीक्षक गोरख गोसावी,सहाय्यक उद्यान अधीक्षक मंजुषा हिंगे, राजेश वसावे, ग्रीन यात्रा या सेवाभावी संस्थेचे संस्थापक डॉ. प्रदीप त्रिपाठी व उद्यान विभागाचे



अधिकारी, मुकादम, कर्मचारी तसेच नागरिक, जेष्ठ नागरिक, आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते जागतिक वसुंधरा दिन आणि अक्षय तृतीयादिनानिमित्त केशर जातीचा आंबा या वृक्षाच्या रोपाचे वृक्षारोपण करण्यात आले तसेच इतर मान्यवरांच्या हस्तेही वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी माझी वसुंधरा या उपक्रमांतर्गत पृथ्वीच्या संरक्षणाची त्याचबरोबर पर्यावरणाच्या संरक्षणाची, झाडे लावण्याची सामूहिक शपथ घेतली.उप आयुक्त रविकिरण घोडके यांनी जून-जुलै महिन्यात करण्यात येणाऱ्या झाडांच्या लागवडीबाबत व उद्यान विभागाचे आधुनिकीकरण, देखभाल दुरुस्ती रस्त्याच्या दुभाजकांचे शुशोभीकरण याबाबतीत माहिती सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपायुक्त रविकिरण ेडके यांनी केले.

### पाण्याचा वापर काटकसरीने करावा...

**» विविध सेवाभावी संस्था, सी एस आर च्या माध्यमातून औद्योगिक कंपन्या यांनी पुढाकार घेऊन शहरात जास्तीत जास्त वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल राखण्यात आपले योगदान द्यावे,त्याचबरोबर नागरिकांनी दैनंदिन इ-व्हेईकल चा वापर करावा जेणेकरून प्रदूषण कमी होण्यास मदत होईल,त्याचबरोबर सौर ऊर्जेचा वापर करावा . वीज आणि पाण्याचा वापर नागरिकांनी काटकसरीने करावा, असेही आवाहन आयुक्त सिंह यांनी केले.**

# उद्योगनगरीमध्ये रमजान ईद उत्साहात !

## » चिमुकल्यांचा उत्साह : 'ईद मुबारक' म्हणत एकमेकांना शुभेच्छा

**।पिंपरी। महाईन्यूज ।**

**जकात, फित्रा, खैरात करून पिंपरी चिंचवड शहरातील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद उत्साहात साजरा केली. ईदगाह मैदान, मस्जिद, मदरसामध्ये नमाज पठण झाल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत 'ईद मुबारक' म्हणत मुस्लीम बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा दिल्या.**

घरोघरी मुस्लिम महिलांनी नजाम पठण करून ईद साजरी केली. ईदगाह मैदान येथे चिंचवड प्रवासी संघाचे अध्यक्ष गुलामअली भालदार यांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. विविध भागात स्थानिक राजकीय सामाजिक आदी क्षेत्रातील मान्यवरांनी मुस्लिम बांधवांची भेट घेवून ईद निमित्त पुष्प देवून शुभेच्छा दिल्या.

रमजान महिन्यात इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद सल्ललाहू अलेही व सल्लम याचा सर्वात प्रिय महिना म्हणून रमजान महिना ओळखला जातो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्व वयोगटातील मुस्लिम बांधवांनी रोजा (उपवास) महिनाभर केला, या महिनाभरात रोजा, नमाज,



रात्रीची तराबिह विशेष नमाज, शबे कद्रची रात्र, कुरआन पठण, जकातुल फित्र आदी संपन्न झाले. अनेक बांधवांनी पाच वेळची नमाज पठण केली.आज ईदची नमाज पठणापूर्वी श्रीमंत, सधन आणि चांगली आर्थिक परिस्थिती असणाऱ्यांनी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तिमागे अडीच किलो धान्य किंवा तेवढी रक्कम आर्थिक परिस्थिती कमकुवत असणा-या गरीब कुटूंबांना दान म्हणून देण्यात आले. जेणेकरून गरीबातील गरीबालासुद्धा ईद साजरी करता यावी. शुक्रवारी चंद्रदर्शन झाल्यामुळे आज पिंपरी-चिंचवड शहरात आज ईद उत्साहात साजरी करण्यात आली. भल्या सकाळीच मुस्लिम बांधव नवीन कपडे परिधान करून, अत्तर, सुवासिक तेल लावून सगळ्यांची पावले जवळच्या मजीद व मदरसाकडे वळाली, चिंचवडगाव, वाल्हेकरवाडी, चिंचवड स्टेशन, मोहननगर, चिखली घरकुल, खराळवाडी, पिंपरी, नेहरूनगर, इंद्रायणीनगर, लांडेवाडी, भोसरी, पिंपरी, काळेवाडी, कस्पटेवस्ती, थेरगाव-वाकड, काळाखडक, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, नवी सांगवी, जुनी सांगवी, निगडी, आकुर्डी, दळवीनगर, कासारवाडी, दापोडी आदी परिसरात मजीद व मदरसामध्ये मौल्लानींनी मुस्लिम बांधवांना धर्मगुरूंनी नमाज पढविला.

# जनतेच्या मनातील मुख्यमंत्री!

## पुण्यात लागले अजित पवारांचे बॅनर, राष्ट्रवादी आणि घड्याळ गायब!

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**अजित पवार सध्या राज्यातील राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत. गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण राजकारण त्यांच्या भोवती फिरत आहे. पंतप्रधान मोदींचं कौतुक असो की शिवसेना (उद्धव ठाकरे ) खासदार संजय राऊत यांना दिलेले सडेतोड प्रत्युत्तर असो, अजित पवार सध्या फॉर्ममध्ये आहेत. आता पुण्यात त्यांचे बॅनर लागल्याने तर्कवितर्क लावले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे बडे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या भाजपच्या कथित जवळीकवरून गेल्या काही दिवसांपासून राज्यातील राजकारण कमालीचे तापले आहे. मात्र अजित पवार यांनी भाजपसोबत जाण्याच्या सगळ्या चर्चांवर पूर्णविराम लावला आहे. तरीही चर्चा काही थांबण्याचे नाव घेत नाही.**

एका वृत्तपत्राच्या कार्यक्रमात अजित पवारांनी 'मुख्यमंत्री व्हायला नक्कीच आवडेल' असे विधान काल केल्यानंतर या चर्चांना पुन्हा पेव फुटला आहे. त्यातच आता पुण्यातील कोथरूड भागात 'जनतेच्या मनातील मुख्यमंत्री' असा उल्लेख असलेला बॅनर लागल्याने या चर्चांना अजूनच हवा मिळाली आहे.



राष्ट्रवादी काँग्रेसचे दिग्गज नेते आणि विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुण्यात मोठे वक्तव्य केले आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस आताही मुख्यमंत्रीपदावर दावा ठोकू शकते. यासाठी २०२४च्या निवडणुकांची वाट पाहण्याची गरज नाही', असे अजित पवार म्हणाले आहेत. अजित पवार यांचे हे वक्तव्य येताच पुण्यातील कोथरूड भागात 'जनतेच्या मनातील मुख्यमंत्री, महाराष्ट्राच्या राजकारणाचा केंद्रबिंदू' अशा आशयाचे बॅनर लागल्याने पुन्हा चर्चा सुरू झाल्या आहेत.

### अजित पवारांच्या भूमिकेकडे अजूनही सर्वांचे लक्ष

**» अजित पवार यांच्या समर्थक दीपाली डोख यांनी हे बॅनर लावले आहे. मात्र या बॅनरवरून राष्ट्रवादी पक्षाचा उल्लेख आणि घड्याळ चिन्ह गायब झालेले दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्याचे राजकारण अजित पवार यांच्या भोवती फिरत आहे. अजित पवार आधी नॉट रिचेबल झाल्याने तर्कांना उधाण आले होते. त्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी ट्विट करून अजित पवार हे भाजपसोबत जाणार असल्याचा दावा केला होता. त्यामुळे अजितदादा हे भाजपसोबत जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. या वृत्तात काहीही तथ्य नसल्याचे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी स्पष्ट केले होते. अजित पवार यांनीही या अफवा असल्याचे सांगत चर्चांना पूर्णविराम दिला होता. तरीही असे बॅनर का लावले जात आहेत? यावरून शंका उपस्थित केली जात आहेत. यामुळे अजित पवारांच्या भूमिकेकडे अजूनही सर्वांचे लक्ष आहे.**

# पुण्यातील गावाच्या कारभाराची धुरा बहीण भावावर!

## सरपंच उपसरपंच पदी वर्णी, भुकूमच्या गावकऱ्यांनी इतिहास घडवला

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

महाराष्ट्रानं स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांना संधी देत देशापुढं आदर्श निर्माण केला. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज संस्थांमध्ये महिलांसाठी ५० टक्के जागा राखीव आहेत. त्यामुळं राजकारणातील महिलांची संख्या वाढली आहे. अनेक महिलांनी राजकारणात विविध पदांवर काम करताना ठसा उमटवला आहे. गावपातळीवर देखील अनेक महिलांनी सरपंच म्हणून चांगली कामगिरी केलेली आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील भुकूम ग्रामपंचायतीचा सरपंच आणि उपसरपंच पदाचा कारभार बहीण-भाऊ बघणार आहेत. भुकूम ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मयुरी आमले यांची बिनविरोध निवड झाली तर उपसरपंचपदी अंकुश खाटपे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

मयुरी आमले यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी सुहास कांबळे यांनी मयुरी अभिलाष आमले यांना सरपंच म्हणून घोषित केले. निर्वाचित सरपंच आणि उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची मिरवणूक भुकूम गावठाण ते आंग्रेवाडी पर्यंत काढण्यात आली. भूकूम गावच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच सख्खे मावस बहीण आणि भाऊ सरपंच आणि उपसरपंचपदी विराजमान झाले असल्यामुळे नागरिकांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. उपसरपंच पदी अंकुश खाटपे यांची अगोदरच निवड झाली होती.

या अगोदरच्या सरपंच गौरी प्रसाद भरतवंश यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यामुळे सरपंच पद रिकामे झाले होते. भुकूम गावच्या इतिहासात पहिल्यांदा ही निवड झाल्याने त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव करण्यात येत आहे. गावचा कारभार महिलेच्या हाती आल्याने याचा गावच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे.



### गावकऱ्यांनी केली विश्वासाने बिनविरोध निवड

**» युवा सरंपच झालेल्या मयुरी आमले गावाच्या विकासासाठी मोठा बदल करणार आहेत. यामुळेच गावकऱ्यांनी विश्वासाने त्यांची बिनविरोध निवड केली आहे.यावेळी तलाठी नामदेव पासलकर ग्रामसेवक भागवत यादव,उपसरपंच अंकुश खाटपे , ग्रामपंचायत सदस्य सचिन हगवणे,सचिन आंग्रे, निलेश ननावरे, गौरी प्रसाद भरतवंश,रेखा योगेश वाघ, सुवर्णा रामदास आंग्रे, सुवर्णा सुभाष पानसरे, यावेळी पोलिस पाटील सतीश गुजर, माऊली आंग्रे, दिलीप चोरघे, योगेश वाघ, शरद पवार, पांडूरंग मराठे, नितीन कुडले, राजेंद्र आंग्रे,पोलीस कर्मचारी अनिता रवळेकर,निवास जगदाळे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.**

# अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ४५४६ मालमत्तांची नोंदणी

।पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेला राज्यात सुमारे ४५४६ मालमत्तांची दस्त नोंदणी करण्यात आली. यामध्ये दुकाने, सदनिका, जमीन आदींचा समावेश आहे. या माध्यमातून आठ कोटी सात लाख रुपयांचा महसूल जमा झाला.

राज्यातील मोजकी दस्तनोंदणी कार्यालये शनिवारी आणि रविवारी सुरू राहणार आहेत. अक्षय तृतीयेनिमित्त नागरिकांचा मालमत्ता खरेदीकडे कल असतो. त्यामुळे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने राज्यातील ५४३ पैकी मोजकीच दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवली होती. राज्यभरातून अभिहस्तांतरणपत्र, बक्षीसपत्रे, गहाणखत आदी ४५४६ दस्त नोंदविले गेले. त्यातून सुमारे आठ कोटी सात लाख रुपयांचा महसूल मिळाल्याचे नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून सांगण्यात आले. दरम्यान, सरलेल्या आर्थिक वर्षात नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाने मालमत्ता खरेदी-विक्री व्यवहारांतून तब्बल ४३ हजार कोटींचा महसूल गोळा केला. चालू आर्थिक वर्षात (सन २०२३-२४) आतापर्यंत सुमारे १५०० कोटींचा महसूल मिळाला आहे. एप्रिलअखेरीस दोन हजार कोटींपेक्षा अधिकचा महसूल मिळेल, असा विश्वासही नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून व्यक्त करण्यात आला.



# ‘पीएमआरडीए’च्या मदतीला ड्रोनची ‘करडी नजर’!

## » अनधिकृत बांधकामांचे होणार सर्वेक्षण : तज्ज्ञ व्यक्तींची केली नेमणूक

।पुणे।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (पीएमआरडीए) कार्यालयामध्ये आधुनिक तंत्रज्ञान असलेली ड्रोन प्रणाली गेल्या वर्षी ऑगस्टपासून वापरण्यात येत आहे. या प्रणालीतील अद्ययावत डिफरेंशियल ग्लोबल पोजिशनिंग सिस्टीम (डीजीपीएस) आणि कॉर्स तंत्रज्ञान असलेले ड्रोन खरेदी करण्यात आले आहेत. नगर रचना योजनांची आखणी व विकास, नदी सुधार प्रकल्प, रस्ते रुंदीकरण आणि सुविधा क्षेत्राचे हस्तांतर, अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण यांसाठी या ड्रोनचा वापर करण्यात येणार आहे.**






पीएमआरडीएकडून प्रामुख्याने नगर रचना योजना, सुविधा भूखंड हस्तांतर प्रकिया, अनधिकृत बांधकामावर नजर ठेवण्याकरिता ड्रोन प्रणालीचा वापर करण्यात येत आहे.

पीएमआरडीए क्षेत्रात सुमारे ८१४ गावांचा समावेश असून एवढ्या मोठ्या क्षेत्राची निगराणी ठेवण्याकरिता पीएमआरडीए कार्यालयाकडून डीजीपीएस, कॉर्स असलेले अद्यावत तंत्रज्ञान असलेले ड्रोन खरेदी करण्यात आले आहे. या ड्रोनचे महानगर आयुक्त राहुल महिवाल, अतिरिक्त महानगर आयुक्त दिपक सिंघला यांच्या हस्ते नुकतेच उद्‌घाटन करण्यात आले.

दरम्यान, डीजीपीएस, कॉर्स या अद्ययावत तंत्रज्ञान असलेला ड्रोन अधिक कार्यक्षम पद्धतीचा असून पीएमआरडीए कार्यालयामध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान अद्ययावत करण्यात आले आहेत. पीएमआरडीए कार्यालयातील ड्रोन कक्षाकरीता विशेष कौशल्य असलेल्या तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्यात आली आहे. हा कक्ष उपजिल्हाधिकारी रामदास जगताप यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असून या कक्षात डॉ. प्रितम वंजारी मुख्य भौगोलिक माहिती तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत.

> **“ पीएमआरडीए हद्दीतील नगर रचना योजनांची आखणी व विकास, नदी सुधार प्रकल्प, रस्ते रुंदीकरण आणि सुविधा क्षेत्राचे हस्तांतर, अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण यांसाठी पीएमआरडीए या नवीन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करेल.**
> **– रामदास जगताप, उप जिल्हाधिकारी, पीएमआरडीए.**

---

# सोन्याचे दागिने चोरणारा गजाआड

## » गुन्हे शाखेची कारवाई : सुमारे दीड लाखाचा ऐवज जप्त

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी: पिंपरीत पती-पत्नी कामासाठी बाहेर गेले होते. (दि. १७) रोजी नेहमीप्रमाणे दोघेही नोकरीसाठी गेले असताना सायंकाळी ५.०० च्या सुमारास राहत्या घरातुन सोन्याचे गंठन, मिनी गंठन, सोन्याची ठुशी, अंगठी असा सोन्याचा ऐवज चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी पिंपरी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी पोलीस अंमलदार यांना चोरीच्या तपासाच्या सुचना देवून समांतर तपास सुरु केला.**



घटनास्थळी दरवाजाचे कुलूप किंवा कडी-कोयंडा तोडलेला नव्हता. त्यामुळे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे यांची सातत्याने वेळोवेळी पाहणी केली. चोरट्याने बनावट चावीचा वापर केला असावा असा संशय बळावला. दरम्यान नेहरुनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात सापळा लावुन आरोपीला ताब्यात घेतले. उमेश रमेश भोसले (वय २८ वर्षे, धंदा- हॉटेल कुक, रा. मुळ चिंचोली ता. आवसा जिल्हा लातुर; सध्या शिवदत्त रिसॉर्टमध्ये शिरकोली ता. वेल्हे जि. पुणे) याला पोलिसांनी ताब्यात घेतले.ही कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह पोलीस आयुक्त मनोज लोहीया, अप्पर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त गुन्हे स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे पद्माकर घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम, पोलीस अंमलदार शिवानंद स्वामी, पोना १९२३ आतिष कुडके, १९२४ नामदेव कापसे, पोकों १९३१ शिवाजी मुंढे, १९२० अजित सानप, २०१७ उध्दव खेडकर यांनी केली आहे.

### बनावट किल्लीच्या मदतीने चोरी...

**» आरोपीकडून सोन्याचे गंठन, सोन्याची ठुशी, सोन्याची मिनी गंठन व सोन्याची अंगठी असा एकूण १,५०,००० रुपये किंमतीच्या सोन्याच्या दागिने हस्तगत केले. त्याने ओळखीचा फायदा घेवून बनावटी किल्लीचा वापर करून चोरी केल्याची कबुली दिली. चोरटयाकडे इतर घरफोडी चोरी गुन्हयांचे अनुषंगाने सखोल तपास करुन गुन्हयाचेकामी पिंपरी पोलीस स्टेशनला हजर केले आहे.**

---

# शहरात पाणी टंचाई, टँकरचा सुळसूळाट!

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेच्यावतीने एक दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. शहराला पाणी पुरवठा करणारे पवना धरण दरवर्षी शंभर टक्के भरते. परंतु; महापालिका सुमारे ४८० दशलक्ष लिटर्स (एमएलडी) पाणी उचलूनही शहराची लोकसंख्या २५ लाखांच्या पुढे गेल्याने तो अपुरा पडत आहे.

त्यातच महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाला ४० टक्के म्हणजेच सुमारे १९२ एमएलडी पाण्याची गळती थांबविणे अथवा कमी करणे शक्य झालेले नाही. अनेक भागात अपुरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने टँकर लॉबीचा सुळसूळाट झालेला दिसून आला.

टँकर माफियांनी या पाण्याच्या व्यावसायातून कोट्यावधी रुपये कमविले आहेत. त्यामुळे ही पाणी टंचाई या लॉबीला पोसण्यासाठी तर केली जात नाही ना, असा सवाल आता नागरिक उपस्थित करु लागले आहेत.

### टँकरच्या पाण्यासाठी करावा लागतो खर्च

**»किवळे - रावेत शिंदेवस्ती येथील नॅनो स्पेस आणि किवळे कोतवालनगर येथील देवराई सोसायटीत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार सदनिकाधारकांनी केली आहे. त्यामुळे या सोसायट्यांमध्ये पाण्याची गरज भागविण्यासाठी अतिरिक्त पैसे खर्च करून टँकर मागवावे लागतात.**

# अजितदादा पवारांचे तथाकथित बंड..!



भाष्य

नितीन सावंत
91 9892514124

**राष्ट्रवादी काँग्रेस चे फायरब्रांड नेते अजितदादा पवार यांचे तथाकथित बंड तूर्त लांबणीवर पडले आहे.अजितदादांनी मरेपर्यंत पक्षात राहण्याची घोषणा केली आणि सर्व प्रकरण थंडावले.अजितदादांनी सुध्दा चार दिवस माध्यमांना पतंग उडवू दिल्या.अखेर मंगळवारी माध्यमांना झापून प्रकरण शांत केले. चार दिवसांपूर्वी एका इंग्रजी दैनिकात अजितदादांच्या बंडाची बातमी झळकली आणि चर्चेला सुरुवात झाली.त्यासाठी अजितदादा यांच्यावर कसा अन्याय होतोय आणि त्यांना पक्षात तसेच महाविकास आघाडीत कसे डावलले जात आहे,याचे दाखले दिले गेले.विशेष म्हणजे एखाद्या पक्षात बंड होते,त्यावेळी त्याचा किंचितसा ही मागमूस माध्यमांना लागत नाही**



.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे समर्थक विधानपरिषद निवडणुकीत मतदान करुन सुरतकडे रवाना होत होते,याचा मागमूस ही माध्यमांना नव्हता.अजितदादांचे बंड खरे होते का? की या माध्यमांचा वावड्या होत्या हे काळच ठरवेल.पण अजितदादा नाराज आहेत,हे काही खरे नाही. अजितदादा आणि देवेंद्र फडणवीस यांचा संबंध खूप सौहार्दाचे आहेत.सिंचन घोटाळ्यात स्वपक्षीय विरोधात असताना अजितदादांना त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीस यांनी वाचवले.त्याचबरोबर तुमच्याच पक्षाच्या लोकांनी तुमचा कार्यक्रम करायचा ठरवला होता,त्याचे पुरावेही दाखवले.फडणवीस यांचे राजकारण सुडाचे नसते.त्यांनी संकटात असलेल्या त्यांच्यापेक्षा वरिष्ठ नेत्यांना वाचवले आहे,याची अनेक उदाहरणे आहेत.अजितदादा तर कधीच गजाआड गेले असते पण फडणवीस त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले.आता राज्य सहकारी बँकेच्या घोटाळ्यात अजितदादा आणि त्यांचे कुटुंबीय गजाआड जाऊ शकतात,अशी चर्चा सुरु झाली.त्यांना इडी कोणत्याही क्षणी अटक करु शकते,अशीही चर्चा होती.त्यामुळेच अजितदादा भाजप मध्ये जातील,या वावड्याना पुष्टी मिळाली. अजितदादा यांच्यावर पक्षाने आताच नव्हे तर २००४ साली अन्याय केला आहे.याला जबाबदार प्रफुल्ल पटेल आणि स्वतः शरद पवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस ला ७१ जागा मिळाल्या असताना त्यांनी मुख्यमंत्री पदावर पाणी सोडले.६९ जागा मिळालेल्या काँग्रेस ला मुख्यमंत्री पद अजितदादांना मिळू नये यासाठीच सोडले.यासाठी पवारांचे कान प्रफुल्ल पटेल यांनीच फुंकले,हे सर्वश्रुत आहे. त्याबदल्यात केंद्रात विमानवाहतूक मंत्रालयाचा स्वतंत्र कार्यभार प्रफुल्ल पटेल यांना मिळाला. राज्यात तीन अधिक खाती मिळाली.पण अजितदादांना मुख्यमंत्रीपद न मिळाल्याचा आसुरी आनंद प्रफुल्ल पटेल यांना झाला होता. तेव्हापासून मुख्यमंत्री पद अजितदादांना हुलकावणी दाखवत आहे. आता अचानक अजितदादा यांच्या फुटीच्या वावड्या का उठवल्या गेल्या? हा प्रश्न ही अनुत्तरित आहे.वेगवेगळ्या शक्याशक्यता व्यक्त करून त्याची उत्तरे माध्यमेच देत आहेत. राष्ट्रवादीचे अधिकृत प्रवक्ते किंवा स्वतः शरद पवार यावर फारसे काही बोलत नाहीत. राजकारणी कधीच खरे बोलत नाहीत.त्यामुळे अजितदादांच्या खुलाशावर माध्यमे अद्याप विश्वास ठेवण्यास तयार नाहीत.पण ज्या काहीं शक्यता व्यक्त होत आहेत.त्या जर - तर च्या गोष्टी आहेत.जर शिंदे सेनेचे १७ आमदार अपात्र झाले तर अजितदादा फुटणार? ही त्यापैकी एक शक्यता आहे.पण हे आमदार अपात्र होणार का? याचे उत्तर सर्वोच्च न्यायालयच देऊ शकेल.मात्र त्यानंतर चा प्लान भाजपच्या अगोदर माध्यमांकडे तयार आहे.माध्यमांनी या बातम्या दाखवल्या आणि माध्यमे च याचा उल्लेख वावड्या असा करत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस चे सर्वेसर्वा शरद पवार अशावेळी नेहमी गप्प राहतात. माध्यमांना पतंग उडवू देतात.आणि त्यांना वेळेवर तोंडघशी पाडतात. उद्योगपती अडाणी यांची शरद पवार यांनी बाजू घेतल्यानंतर त्यांच्यावरही कुणी विश्वास ठेवण्यास तयार नाही.अजितदादा यांच्या अगोदर तेच भाजपला पाठिंबा देऊन मोकळे होतील आणि सुप्रिया सुळे यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी पुढे करतील,अशी चर्चा काँग्रेस वालेच करत आहेत. शरद पवार ही अंदाज घेत आहेत अजितदादा हे त्यांचे वारसदार म्हणून त्यांना किंमत आहे. भाजपला ही शरद पवारांचे घर फोडायचे आहे त्यांना घराणे फोडण्यात आनंद मिळतो.

## संपादकीय »

### जातगणनेचे आयुध

***भाजपच्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजनीतीला पर्याय देण्याचा प्रयत्न जातनिहाय जनगणनेच्या मुद्याच्या आधारे काँग्रेस करू पाहात आहे.***

जातीची गणिते आणि त्याच्या बळावर सत्ताकारण हा देशातील राजकारण्यांचा जिव्हाळ्याचा विषय. चालू वर्षात कर्नाटक, मध्य प्रदेश, राजस्थानसह नऊ राज्य विधानसभांच्या निवडणुका होत आहेत. पाठोपाठ सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजेल. हे लक्षात घेता कर्नाटकातल्या प्रचारमोहिमेत काँग्रेसचे नेते राहुल गांधींनी जातनिहाय जनगणनेच्या मागणीचा केलेला पुनरुच्चार अपेक्षितच म्हटला पाहिजे. गांधींनी आरक्षणावरील ५० टक्के मर्यादा उठविण्याचीही मागणी केली. अलीकडच्या काळात भाजप करीत असलेल्या हिंदुत्वाच्या राजकारणाला पर्यायी विचारप्रणाली पुढे आणण्यासाठी विरोधक प्रयत्नशील आहेतच. देशातील मागासांच्या कल्याणासंदर्भात त्यादृष्टीने चाचपणी काही पक्ष करीत आहेत. काँग्रेसने आता तो मुद्दा उचलला आहे, असे राहुल यांच्या भाषणावरून दिसते.

## पुलवामाचं उत्तरायण



**पुलवामा इथं सीआरपीएफच्या ताफ्यावर दहशतवाद्यांनी हल्ला केला, त्यात ४० जवानांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर भारताकडून बालाकोटमध्ये दहशतवाद्यांच्या तळावर सर्जिकल स्ट्राईक झाला.**

पुलवामाला उत्तर म्हणून हा प्रतिहल्ला झाला तेव्हा पाकिस्तानला धडा शिकवल्याच्या वातावरणात काही मूळ प्रश्न बाजूला पडले होते. हा हल्ला कसा झाला आणि तो रोखता आला असता काय, तो रोखता आला नाही याची जबाबदारी कुणाची? पाच वर्षांपूर्वी दडपलेले हे प्रश्न काश्मीरचे तत्कालीन राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्या मुलाखतीनं पुन्हा समोर आले आहेत. बालाकोटच्या कारवाईचं श्रेय घेणारं सरकार, पुलवामाचा हल्ला रोखण्यात आलेल्या अपयशाची जबाबदारी कुणाची, हे आता तरी सांगेल काय?

सत्यपाल मलिक यांचे गौप्यस्फोट अनेक अर्थांनी भारतीय जनता पक्षासाठी अडचणीचे आहेत. भाजप बहुमतानं सत्तेवर येण्यात देशाच्या सुरक्षेत कणखर भूमिका घेण्याचा आशावाद होता, तसाच घोटाळ्यांच्या आरोपांनी ग्रासलेल्या यूपीए सरकारच्या विरोधात 'ना खाऊँगा, ना खाने दूँगा' असा पर्याय समोर असल्याचं आकलन तयार करता आलं होतं. या आकलनाच्या खेळावर आघात करणारी विधानं मलिक यांनी केली आहेत. भाजपच्या या प्रकारच्या प्रतिमानिर्मितीवर हल्ला अनेकांनी केला आहे. मात्र, ते सारे विरोधक होते आणि आहेत. राहुल गांधी किंवा अरविंद केजरीवाल हे मुद्दे उपस्थित करतात; मात्र, भाजपच्या सरकारनंच नेमलेले राज्यपाल, याच प्रकारचा अर्थ लावता येईल, अशी विधानं करतात तेव्हा त्याचं गांभीर्य आपोआपच वाढतं.

मलिक यांच्या मुलाखतीतील दोन मुद्दे अत्यंत ठोसपणे भाजपच्या प्रतिमानिर्मितीला धक्का देऊ शकणारे आहेत, ते थेट पंतप्रधानांवरही बोट ठेवणारे आहेत. एकतर पुलवामा इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या वेळी संपूर्ण यंत्रणा निष्काळजी होती, या बाबीचा हा हल्ला यशस्वी होण्यात आणि परिणामतः ४० जवानांचा मृत्यू होण्यात वाटा असल्याचं मलिक यांचं निदान आहे. ते स्वतःसह सर्व यंत्रणेला यात जबाबदार धरतात.

रस्तेमार्गानं असा जवानांचा प्रवास अनाठायी होता, त्याविषयीची चिंता आधीच समोर आली होती. सीआरपीएफनं जवानांच्या या प्रवासासाठी विमानांची मागणी केली होती; मात्र ती नाकारली गेली. ही मागणी नाकारणारे गृह मंत्रालयातील होते असं मलिक सांगतात. पुलवामाचा हल्ला झाला तेव्हाही इतक्या मोठ्या संख्येनं एकाच वेळी जवानांना काश्मीरमध्ये हलवताना रस्तेमार्गाचा वापर करणं ही मोठी चूक होती, असं अनेकांनी सांगितलं होतंच. त्या वेळी दहशतवादी हल्ल्याचा धक्का आणि पाकिस्तानवर उफाळलेला संताप यांत हे आवाज दबून गेले. मात्र, मलिक आता सांगतात त्याप्रमाणे, विमानप्रवासाची मागणी केली असेल आणि ती नाकारली गेली असेल तर या हलगर्जीपणासाठी इतक्या वर्षांत सरकारनं काय केलं हे सांगायला हवं.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मराठा समाज पुन्हा आक्रमक!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना दिला इशारा

।मुंबई।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर सुप्रीम कोर्टामध्ये याचिका दाखल करण्यात आलेली होती. सदर याचिका न्यायालयाने फेटाळली आहे. राज्य सरकारने सुप्रीम कोर्टामध्ये पुनर्विचार याचिका दाखल केली होती. मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर ही याचिका दाखल करण्यात आलेली होती.**

### आरक्षणाचा प्रश्न लवकर सोडवा

**आरक्षणाचा प्रश्न लवकर सोडवला अन्यथा मुख्यमंत्र्यांना आषाढी एकादशीची शासकीय पूजा करू देणार नाही असा पवित्रा समाजाच्या वतीने घेण्यात आला आहे.मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाज आक्रमक झाला आहे. सरकारचा निषेध म्हणून मराठा समाजाच्या वतीने पंढरपुरमध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा पुतळा जाळून निषेध नोंदवण्यात आला आहे.**

राज्य सरकारची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली असून हा सरकारला धक्का बसला आहे. यानंतर आता राज्यात पुन्हा एकदा मराठा समाज आक्रमक झाला आहे. आता राज्यात पुन्हा संघर्ष पाहिला मिळणार आहे.

मराठा समाजाने आता थेट तुळजापूर ते मंत्रालय असा मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. महामोर्चाच्या निमित्ताने एक मराठा, लाख मराठा ही घोषणा पुन्हा एकदा गुंजणार आहे. तसेत मराठा समाजाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना इशारा देखील देण्यात आला आहे.

आरक्षणाचा प्रश्न लवकर सोडवला अन्यथा मुख्यमंत्र्यांना आषाढी एकादशीची शासकीय पूजा करू देणार नाही असा पवित्रा समाजाच्या वतीने घेण्यात आला आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी समाज आक्रमक झाला आहे. सरकारचा निषेध म्हणून मराठा समाजाच्या वतीने पंढरपुरमध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा पुतळा जाळून निषेध नोंदवण्यात आला आहे.



मराठा आरक्षणाची याचिका राज्य सरकार बाजू मांडण्यास कमी पडल्यामुळेच फेटाळण्यात आल्याचा आरोप मराठा समाजाने केला आहे. समाजाच्या वतीने तुळजापूर ते मुंबईपर्यंत मोर्चा छत्रपती शाहू महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधत एल्गार पुकारणार आहे.

एक महिनाभर मराठा समाजाचे कार्यकर्ते तुळजापूर ते मुंबई मंत्रालय पायी यात्रा काढणार आहेत. 6 जूनला मुंबईमधील आझाद मैदानावर शिवराज्याभिषेक दिन साजरा करणार असल्याची भूमिका मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी घेतली आहे.

---

# "अजित पवारांमध्ये मुख्यमंत्री होण्याची क्षमता"!

## संजय राऊत: सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा विक्रम अजित पवारांच्या नावावर

। मुंबई ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**गेल्या काही दिवसांपासून विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपाबरोबर जाणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. मात्र, अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करत चर्चेला स्वल्पविराम दिला. अशातच अजित पवारांनी मुख्यमंत्रीपदाबद्दल मोठा दावा केला आहे. आगामी २०२४ च्या निवडणुकीनंतर काय, आता म्हटलं तरी मुख्यमंत्रीपदावर दावेदारी ठेवण्याची तयारी आहे. मला १०० टक्के मुख्यमंत्री होण्यास आवडेल, अशी इच्छा अजित पवारांनी व्यक्त केली आहे.**



यावर आता शिवसेना (ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनी भाष्य केलं आहे. ते जळगावात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. "मुख्यमंत्री होण्यास कोणाला आवडणार नाही. अजित पवारांच्यात मुख्यमंत्री होण्याची क्षमता आहे. ते अनेक वर्षापासून राजकारणात असून, मंत्रीही होते. सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा विक्रम अजित पवारांनी केला आहे. त्यामुळे प्रत्येकाला वाटतं आपण मुख्यमंत्री व्हावं. अनेकजण जुगाड करून लायकी नसताना मुख्यमंत्री होतात," असा टोला संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंना अप्रत्यक्षपणे लगावला आहे.

"अजित पवारांनी प्रथमच मुख्यमंत्रीपदाबाबत इच्छा व्यक्त केली नाही. त्यामुळे अजित पवारांना माझ्या शुभेच्छा आहेत," असं संजय राऊतांनी म्हटलं आहे.

संजय राऊतांनी जळगावच्या सभेत चौकटीत बोलावं, नाही तर सभा उधळून लावू, असा इशारा गुलाबराव पाटील यांनी दिला होता. यावर प्रश्न विचारल्यावर संजय राऊत म्हणाले, "आम्ही काल जळगावात आल्यानंतर रेल्वे स्टेशनवर शिवसैनिकांची गर्दी होती. या गर्दीत कुठं उंदीर घुसलाय का? आम्ही बघत होतो," असा टोला गुलबराव पाटलांना संजय राऊतांनी लगावला. 'संजय राऊतांमुळेच महाविकास आघाडीत फूट पडेल,' अशी टीका भाजपाचे खासदर अनिल बोंडे यांनी केली होती. त्यालाही संजय राऊतांनी प्रत्युतर दिलं. "महाविकास आघाडीत फूट पडलेली नाही. महाविकास आघाडी मजबूत आहे. खरं तर मी बोलतो, त्याची भाजपाच्या लोकांना पोटदुखी आहे. मुळात अनिल बोंडे यांना उत्तर द्यावं, इतके ते मोठे नाहीत."

### प्रथमच मुख्यमंत्रीपदाबाबत इच्छा व्यक्त केली

**"मुख्यमंत्री होण्यास कोणाला आवडणार नाही. अजित पवारांच्यात मुख्यमंत्री होण्याची क्षमता आहे. ते अनेक वर्षापासून राजकारणात असून, मंत्रीही होते. सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा विक्रम अजित पवारांनी केला आहे. त्यामुळे प्रत्येकाला वाटतं आपण मुख्यमंत्री व्हावं. अनेकजण जुगाड करून लायकी नसताना मुख्यमंत्री होतात," असा टोला संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंना अप्रत्यक्षपणे लगावला आहे."अजित पवारांनी प्रथमच मुख्यमंत्रीपदाबाबत इच्छा व्यक्त केली नाही. त्यामुळे अजित पवारांना माझ्या शुभेच्छा आहेत," असं संजय राऊतांनी म्हटलं आहे.**

# पाकिस्तानला युद्धाची भीती!

## युद्धाच्या शक्यतेने निवडणुका घेऊ नयेत, दहशतवादाचा धोकाही वाढेल

। नवी दिल्ली महाईन्यूज ।

**पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी पंजाबमधील निवडणुका लांबण्यामागे भारतासोबत युद्धाची भीती हे एक कारण असल्याचे सांगितले आहे. संरक्षण मंत्री म्हणाले- पंजाब प्रांतातील निवडणुकीमुळे देशात अस्थिरता वाढेल. त्यामुळे पाणी वाद, जातीय वाद यासह अनेक मुद्द्यांवर लाभ घेण्याची संधी भारताला मिळणार आहे.**

या अहवालात पाकिस्तान सरकारने पाकिस्तानला पुन्हा 'ग्लोबल ग्रेट गेम'चा बळी बनवण्याची भीती व्यक्त केली आहे, ज्यामध्ये भारताची भूमिका महत्त्वाची आहे. सुप्रीम कोर्टात सादर केलेल्या अहवालात शाहबाज सरकार म्हणाले- पाकिस्तान सीमेपलीकडील दहशतवाद, अस्थिरता, दहशतवादी धमक्या, इस्लामिक स्टेट (आयएस)चे पाकिस्तानात परतणारे सैनिक, भारतीय गुप्तचर संस्था रॉ आणि युद्धाच्या धमक्यांशी लढत आहे. अशा स्थितीत आता निवडणुका घेणे देशाच्या हिताचे नाही.

पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला 14 मेपर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत.पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला 14 मेपर्यंत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. खरे तर पंजाब निवडणुकांबाबत पाकिस्तानात बराच काळ गोंधळ सुरू आहे. शाहबाज सरकार त्या ऑक्टोबरपर्यंत पुढे ढकलू इच्छित आहे, परंतु माजी पंतप्रधान इम्रान खान लवकरात लवकर निवडणुका घेण्याच्या बाजूने आहेत. अशा परिस्थितीत हे प्रकरण



सर्वोच्च न्यायालयात पोहोचले. त्यावर न्यायालयाने निवडणूक आयोगाला मे महिन्यात निवडणूक घेण्याचे आदेश दिले. पंजाब प्रांतातील निवडणुकीसाठी सरकारने निवडणूक आयोगाला 21 अब्ज रुपये द्यावेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. त्यासाठी 10 एप्रिलची मुदत ठेवण्यात आली होती. मात्र, सरकारने न्यायालयाचा आदेश मान्य केला नाही आणि ऑक्टोबरमध्ये निवडणुका घेण्याची याचिका केली. त्यामुळे विधानसभा निवडणूक लांबणीवर टाकण्याच्या याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू आहे. सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान शाहबाज सरकारने निवडणूक न घेण्यामागे भारतासोबत युद्धाची भीती असल्याचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे.

## कर्नाटकात राष्ट्रवादीचे नऊ उमेदवार रिंगणात, घड्याळ चिन्ह कायम

। मुंबई । महाईन्यूज ।

राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गमाविलेला राष्ट्रवादी काँग्रेस कर्नाटक विधानसभेच्या नऊ जागा लढवीत आहे. सीमा भागात निपाणीमधून पक्षाचा उमेदवार रिंगणात असेल. राष्ट्रवादी काँग्रेसने अलीकडेच राष्ट्रीय पक्षाचा दर्जा गमाविला. हा दर्जा पुन्हा प्राप्त करण्याचे पक्षाचे प्रयत्न आहेत. या दृष्टीने कर्नाटकमध्ये नऊ उमेदवार रिंगणात आहेत.

सीमा भागात व शक्यतो बेळगावीमध्ये उमेदवार उभे करायचे नाहीत, असे पक्षाचे धोरण होते. पण निपाणी या सीमा भागातील मतदारसंघात उत्तम पाटील यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. पक्षाचा राष्ट्रीय दर्जा काढून घेण्यात आला असला तरी राष्ट्रवादीच्या विनंतीवरून निवडणूक आयोगाने कर्नाटकमध्ये 'घड्याळ' चिन्ह पक्षाला दिले आहे. पक्षाने १५ जणांची स्टार प्रचारकांची यादीही जाहीर केली. शरद पवार, प्रफुल्ल पटेल, सुप्रिया सुळे यांच्यासह राज्यातील क्राईड क्रॅस्ट्रो, शिवाजी गर्जे यांचा यादीत समावेश केला आहे.




## "पुलवामा हल्ला मोदी सरकारच्या बेजबाबदारपणामुळे";

। नवी दिल्ली महाईन्यूज ।

जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी नुकताच 'द वायर'ला दिलेल्या मुलाखतीत जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती आणि पुलवामा हल्ल्याबाबत मोदी सरकारवर गंभीर आरोप केले होते. मोदी सरकारच्या बेजबाबदारपणामुळे पुलवामा हल्ला झाला, असं ते म्हणाले. त्यांच्या या आरोपांनंतर देशाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. दरम्यान, मलिकांच्या आरोपांना आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रत्युत्तर दिलं आहे .इंडिया टुडेच्या कार्यक्रमात बोलताना अमित शाह यांनी सत्यपाल मलिकांच्या आरोपांवर प्रतिक्रिया दिली. "सत्यपाल मलिकांना राज्यपाल पदावरून पायउतार झाल्यानंतरच या सर्व गोष्टी का आठवत आहेत? आणि त्यांना केलेले आरोप खरे असतील तर राज्यपाल पदावर असताना ते या विषयावर का बोलले नाही? याचा विचार आता जनतेने आणि माध्यमांनी करावा. खरं तर लोक जेव्हा सत्तेत असतात तेव्हा अनेकदा त्यांचा विवेक जागा होत नाही", असे ते म्हणाले.



### सत्यपाल मलिकांनी नेमके काय आरोप केले?

» पुलवामा हल्ल्याबाबत सत्यपाल मलिक यांनी मोदी सरकारवर गंभीर आरोप केले होते. "पुलवामा हल्ल्यापूर्वी सीआरपीएफनं एअरक्राफ्टची मागणी केली होती. केंद्रीय गृहमंत्रालयाने नकार दिला. त्यानंतर त्याच दिवशी संध्याकाळी मी पंतप्रधान मोदींशी चर्चा केली. पुलवामा हल्ला आपल्या चुकीमुळे घडलाय असं मी त्यांना सांगितलं. पण त्यांनी मला शांत राहण्यास सांगितलं", असं ते म्हणाले होते.

# "तिरस्काराचं राजकारण करून काही लोक देशाचं विभाजन...

## " ममता बॅनर्जींचा गंभीर आरोप

। कर्नाटक ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही लोक देशाचं विभाजन करण्याचा प्रयत्न करत आहेत आणि तिरस्काराचं राजकारण करत आहेत असं गंभीर आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी केला आहे. भाजपा देशाचं संविधान बदलण्याच्या प्रयत्नात आहे असाही आरोप ममता बॅनर्जींनी केला आहे. माझा प्राण गेला तरीही बेहत्तर मी देश दोन भागात वाटू देणार नाही. पश्चिम बंगालमध्ये NRC अर्थात राष्ट्रीय नागरिक पंजीकरण लागू होऊ देणार नाही असंही ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. ममता बॅनर्जी यांचा हा रोख सरळसरळ**



**भाजपाकडे होता आणि केंद्र सरकारकडे होता यात शंकाच नाही. त्यांनी कुणाचंही नाव न घेता ही टीका केली आहे.**

लोकशाही वाचवलीच पाहिजे एवढंच नाही तर केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर केला जातो आहे असंही ममता बॅनर्जींनी म्हटलं आहे. त्या म्हणाल्या, एक वर्षात हे ठरवण्यासाठी निवडणुका घेतल्या जाणार आहेत की आपल्या देशात कोण सत्तेवर राहिल? तुम्ही आज मला वचन द्या की आपण सगळे एकजूट करून देशाचं विभाजन करू पाहणाऱ्या या शक्तींच्या विरोधात उभं राहू. लोकसभा निवडणुकीत आपण अशा शक्तींना देशाच्या सत्तेवरून खाली खेचणं हे आपलं लक्ष्य असलं पाहिजे असंही ममता बॅनर्जींनी म्हटलं आहे. जर आपण लोकशाही वाचवण्यात अपयशी ठरलो तर सगळंच संपेल असंही ममता बॅनर्जींनी स्पष्ट केलं

ममता बॅनर्जी असंही म्हणाल्या होत्या की लोकसभा निवडणुकीत भाजपाला २०० च्या पुढे जाता येणार नाही. तसंच आपल्या पक्षाचं नाव यापुढे अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस असं असणार आहे असंही त्यांनी म्हटलं होतं.

### दोन दिवसांपूर्वी काय म्हटलं होतं ममता बॅनर्जींनी?

» राष्ट्रीय पक्षाचा दर्जा रद्द झाल्यानंतर मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना फोन केला होता हे जर सिद्ध झालं तर मी माझ्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देईन असं पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जींनी म्हटलं आहे. भाजपाचे नेते सुवेंदु अधिकारी यांनी हा दावा केला होता की तृणमूल काँग्रेसला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा पुन्हा देण्यात यावा म्हणून ममता बॅनर्जींनी अमित शाह यांना फोन केला होता. हा दावा खोडून काढत ममता बॅनर्जींनी थेट आव्हान दिलं आहे आणि आपण प्रसंगी राजीनामा द्यायलाही तयार आहोत असं म्हटलं आहे. ११ एप्रिलला राष्ट्रवादी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस या पक्षांचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा काढून घेतला होता.

# मराठी अभिनेत्रीची नवी इनिंग!



मनोरंजन सृष्टीत अनेक उत्तमोत्तम भूमिका साकारत लोकप्रिय झालेल्या अनेक अभिनेत्री आज अभिनेत्री आणि बिझनेस वुमन अशा दुहेरी भूमिका सांभाळत आहेत. अभिनय क्षेत्रात काम करतानाच मराठी मनोरंजन सृष्टीतील अनेक आघाडीच्या अभिनेत्रींनी त्यांचा स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे. आता या यादीत आणखी एका लोकप्रिय मराठी अभिनेत्रीचे नाव सामील झाले आहे.

विविध मालिका, चित्रपटांमध्ये महत्वपूर्ण भूमिका साकारत प्रेक्षकांची दाद मिळवलेली अभिनेत्री अदिती द्रविडने आज अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. तिने तिचा स्वतःचा कपड्याचा ब्रँड सुरू केला असल्याचं तिने एक खास पोस्ट करत सांगितलं. 'द ड्रेसवाली.को' असं तिच्या कपड्यांच्या या नव्या ब्रँडचं नाव आहे.आज इंस्टाग्रामवर तिच्या या ब्रँडच्या नावाचं पोस्टर शेअर करत तिने लिहिलं, "'द ड्रेसवाली. को!' तुमच्यापैकी अनेकांनी बरोबर ओळखलं. आमची ड्रेसवाली म्हणजे अदिती द्रविड. तीन वर्षे यावर काम केल्यानंतर आज अखेर अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर आम्ही आमचा हा नवीन ब्रँड सुरू करत आहोत. तुम्ही सर्वांनी दाखवलेल्या प्रेमाबद्दल खूप खूप धन्यवाद."

आता तिची ही पोस्ट खूप चर्चेत आली आहे. तर याचबरोबर तिच्या कपड्यांच्या या नवीन ब्रँडच्या नावाकडेही सर्वांचे लक्ष वेधलं गेलं आहे. आता या तिच्या पोस्टवर तिचे चाहते आणि मनोरंजन सृष्टीतील तिचे मित्रमंडळी कमेंट करत तिचं अभिनंदन करत आहेत. याचबरोबर या नवीन प्रवासासाठी तिला शुभेच्छा देत आहेत.

# बाप-लेकाची हटके जोडी

अभिनेता आदेश बांदेकर आणि सुचित्रा बांदेकर यांचा मुलगा अभिनेता सोहम बांदेकर हा कायमच विविध कारणांमुळे चर्चेत असतो. सोहमने आई वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत मराठी मनोरंजन क्षेत्रात पदार्पण केले. स्टार प्रवाहवरील नवे लक्ष्य या मालिकेतून तो छोट्या पडद्यावर झळकला. नुकतंच सोहमने एक पोस्ट शेअर केली आहे. यामुळे तो चर्चेत आला आहे.

सोहम हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. तो अनेकदा त्याच्या आगामी प्रकल्पाबद्दल माहिती शेअर करत असतो. नुकतंच सोहमने इन्स्टाग्रामवर एक फोटो पोस्ट केला आहे. त्याला त्याने हटके कॅप्शन दिले आहे.या फोटोत आदेश बांदेकर आणि सोहम बांदेकर यांनी एकाच रंगाचे कपडे परिधान केले आहेत. यात आदेश बांदेकर यांनी निळ्या रंगाचा एक शॉर्ट कुर्ता परिधान केला आहे. तर सोहमने निळ्या आणि पांढऱ्या रंगाची जर्सी परिधान केली आहे. त्याबरोबर त्या दोघांनी गडद निळ्या रंगाची जिन्स परिधान केली आहे.

"अचानक जुळून आलेला योगायोग, त्यामुळे मग संधी गमावली नाही", असे कॅप्शन सोहमने या फोटोला दिले आहे.

त्याच्या या फोटोवर अनेक कलाकारांनी कमेंट केल्या आहेत. अभिनेत्री सना शिंदे ने या फोटोला कमेंट करताना हार्ट इमोजी शेअर केले आहेत. तर विशाल निकमनेही हार्ट इमोजी शेअर करत त्या दोघांना छान दिसत असल्याचे सांगितले आहे.



# विराजस-शिवानीच्या लग्नाच्या पहिल्या वाढदिवानिमित्त




अभिनेत्री शिवानी रांगोळे आणि विराजस कुलकर्णी हे मराठी मनोरंजन सृष्टीतील एक लोकप्रिय जोडपं. गेल्या वर्षी अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर त्यांनी लग्नगाठ बांधली. आज तिथीनुसार त्यांच्या लग्नाचा पहिला वाढदिवस आहे. यानिमित्त अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी त्यांच्या लेकासाठी आणि सूनेसाठी एक खास पोस्ट लिहिली आहे.



लग्नाआधी अनेक वर्षे शिवानी आणि विराजस यांची मैत्री असल्याने विराजसच्या कुटुंबियांशीही शिवानीचे लग्नाआधीच खूप छान बॉण्डिंग तयार झाले. मृणाल कुलकर्णी देखील सोशल मीडियाच्या माध्यमातून त्या दोघांबद्दल असलेल्या प्रेम वेळोवेळी व्यक्त करत असतात. आज त्यांच्या लग्नाला एक वर्ष झालं. मृणाल कुलकर्णी यांनी एक पोस्ट लिहित त्यांना लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.प्रियांकाच्या आगामी चित्रपटांची तिचे चाहते उत्सुकतेने वाट बघतात. प्रियांका ही 'जी ले जरा'या चित्रपटामधून देखील लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन फरहान अख्तर करणार आहे. तसेच कतरिना कैफ आणि आलिया भट या अभिनेत्री या चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका साकारणार आहेत. विराजस आणि शिवानीच्या लग्नातले दोन फोटो पोस्ट करत त्यांनी लिहिलं, "प्रिय शिवानी आणि विराजस, आज अक्षय तृतीया. तिथी नुसार तुमच्या लग्नाचा आज पहिला वाढदिवस !!! एक वर्ष झालं सुद्धा !!! अशीच वर्षं पटापट निघून जातील आणि मग आम्हा सगळ्यांसारखे तुम्ही पण म्हणाल, बापरे इतकी वर्ष झाली? कमालच्चे !!! खूप स्वप्नं बघा आणि ती पुरी करण्यासाठी भरपूर कष्ट करा ! आनंदी राहा ! खूप खूप प्रेम !!"

आता त्यांची ही पोस्ट खूप चर्चेत आली आहे. या पोस्टवर कमेंट करत त्यांचे आणि विराज-शिवानीचे चाहते त्या दोघांना लग्नाच्या पहिल्या

# तुच माझा 'चांद'!



तुरुंगातून सुटल्यापासून शीजान खान सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे आणि आपल्या भावना कवितेच्या माध्यमातून शेअर करत आहे. त्याची एक्स गर्लफ्रेंड तुनिषा शर्माला आठवून तो कधी फोटो, व्हिडिओ तर कधी कविता लिहित राहतो. नुकतेच शीजानने तुनिषाला 'चांद रात'मध्ये चांद म्हणत विश केले आहे.काल रात्री 'चांद रात' होती. या खास प्रसंगी शीझान खानने आपल्या प्रियजनांना चांद रातच्या शुभेच्छा दिल्या आणि तुनिषा शर्माला चांद असे संबोधले. शीझानने इन्स्टा स्टोरीवर एक नोट लिहिली,"जो दूर है नजर से उस चांद को भी चांद मुबारक!" याशिवाय शीजान खानने एक पोस्ट देखील शेअर केली आहे, ज्यामध्ये त्याने 'अली बाबा: दास्तान ए काबुल'च्या सेटवरील अनेक जुने फोटो शेअर केले आहेत. शेवटच्या फोटोत तो तुनिशासोबत हसताना दिसत आहे.

तुनिषा शर्माने २४ डिसेंबर २०२२ रोजी 'अली बाबा'च्या सेटवर गळफास लावून आत्महत्या केली. आत्महत्येच्या १५ दिवस आधी तुनिशा आणि शीजानचे ब्रेकअप झाले होते, त्यामुळे अभिनेत्री खूप नाराज होती. वयाच्या अवघ्या 20 व्या वर्षी या अभिनेत्रीच्या आत्महत्येने तिच्या चाहत्यांसह संपूर्ण देश हादरला. आत्महत्येनंतर तुनिषाच्या आईने शीजान खानवर अनेक गंभीर आरोप केले होते.

# सिंग इज किंग!

## अर्शदीपच्या गोलंदाजीचा जलवा, अटीतटीच्या सामन्यात पंजाबने MI चा केला पराभव

। चेन्नई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**मुंबई इंडियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर पंजाब किंग्जने कर्णधार सॅम करनच्या अर्धशतक आणि हरप्रीत भाटियाच्या ४१ धावांच्या खेळीच्या जोरावर दोनशेचा टप्पा पार केला. २० षटकांत पंजाबने ८ विकेट्स गमावत २१४ धावांपर्यंत मजल मारली होती. परंतु, त्यानंतर या धावांचा पाठलाग करणाऱ्या मुंबई इंडियन्सच्या सूर्यकुमार यादव आणि कॅमेरून ग्रीनच्या वादळी अर्धशतक ठोकलं. परंतु, अटीतटीच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा निसटता पराभव झाला आणि यंदाच्या आयपीएलमध्ये पंजाब किंग्जने सलग चौथ्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. शेवटच्या षटकात अर्शदीप सिंगने तिलक वर्मा आणि नेहल वढेराची दांडी गुल केली आणि मुंबईवर विजय मिळवला.**

मुंबई इंडियन्ससाठी कर्णधार रोहित शर्माने २७ चेंडूत ४४ धावा केल्या. कॅमरून ग्रीनने ४३ चेंडूत ६७ धावांची वादळी अर्धशतकी खेळी केली. तसंच सूर्यकुमार यादवने २६ चेंडूत ५७ धावांची खेळी साकारली. टीम डेविड १३ चेंडूत २५ धावांवर नाबाद राहिला. पंजाबसाठी अर्शदीप सिंगने चार षटकांत २९ धावा देत चार विकेट्स घेण्याची चमकदार कामगिरी केली.

पीयुष चावला आणि अर्जुन तेंडुलकरच्या भेदक माऱ्यामुळं पंजाबचे चार फलंदाज माघारी परतले होते. पण त्यानंतर कर्णधार सॅम करनने आक्रमक फलंदाजी करून पंजाबच्या धावसंख्येचा आलेख चढता ठेवला. सॅमने २९ चेंडूत ५५ धावांची वादळी अर्धशतकी खेळी केली. तसंच हरप्रीत भाटियानेही २८ चेंडूत ४१ धावांची खेळी साकारली. तर जितेश शर्माने षटकारांचा पाऊस पाडत ७ चेंडूत २५ धावा कुटल्या. त्यामुळे पंजाब किंग्जने २० षटकांत ८ विकेट्स गमावत २१४ धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर मुंबईने २० षटकांत ६ विकेट्स गमावत २०१ धावा केल्या.



# पाकिस्तान अखेर भारतापुढे झुकले!

## तटस्थ ठिकाणी खेळण्यासाठी पीसीबी तयार, उर्वरित संघ पाकिस्तानात खेळतील

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने ) शुक्रवारी आशिया चषक स्पर्धेचे आयोजन भारताच्या सामन्यांसाठी तटस्थ स्थळांसह करण्याचा प्रस्ताव आशियाई क्रिकेट परिषदेला (ACC) दिला. पीसीबी प्रमुख नजम सेठी यांनी सांगितले की, "त्यांनी हा प्रस्ताव एसीसीकडे पाठवला आहे. यामध्ये भारत आपले सामने तटस्थ ठिकाणी खेळू शकतो तर उर्वरित देशांचे संघ पाकिस्तानमध्ये खेळतील."**

बीसीसीआयने दोन्ही देशांमधील राजकीय तणावामुळे पाकिस्तान दौरा करण्यास नकार दिला होता आणि आशियाई स्पर्धा तटस्थ ठिकाणी हलवण्याची मागणी केली होती. पीसीबी प्रमुख म्हणून रमीझ राजाची जागा घेणारे सेठी म्हणाले, "आम्ही ही स्पर्धा 'हायब्रीड मॉडेल'वर खेळवण्याचा निर्णय घेतला आहे. जिथे पाकिस्तान आशिया चषक सामने त्यांच्या घरच्या मैदानावर खेळेन आणि भारत त्यांचे सामने तटस्थ ठिकाणी खेळेन. आशियाई क्रिकेट परिषदेकडे आम्ही हा प्रस्ताव दिला आहे

**."वर्ल्ड कपसाठी पाकिस्तानला भारतात जाण्याचा सल्ला**

आशिया चषक २ ते १७ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्याचा प्रस्ताव आहे, ज्यामध्ये सहा संघ सहभागी होणार आहेत. मात्र, कुठे होणार मालिका या अनिश्चिततेमुळे सामन्यांचे नेमके वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. आशिया चषक स्पर्धेत भारत आणि पाकिस्तान व्यतिरिक्त श्रीलंका, अफगाणिस्तान, बांगलादेश यांच्यासह



पात्रता संघ सहभागी होणार आहेत.

पात्रता स्पर्धा नेपाळमध्ये सुरू आहे. पुढील महिन्यात शांघाय कोऑपरेशन ऑर्गनायझेशन (SCO) परिषदेच्या बैठकीसाठी पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी यांच्या भारत भेटीपासून सेठी यांना खूप आशा आहेत. परराष्ट्र मंत्र्यांच्या गोवा भेटीमुळे दोन्ही देशांमधील संबंध सुधारण्यास मदत होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष सेठी म्हणाले, "आम्हाला सांगण्यात आले आहे की संबंध सामान्य असू शकतात. असे झाल्यास भारत २०२५ मध्ये पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सहभागी होण्याचा विचार करेल. आशिया चषक तटस्थ ठिकाणी खेळण्याबरोबरच विश्वचषकासाठी आम्हाला भारतात जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे."सेठी यांनी मात्र हा सल्ला कोणी दिला हे सांगितले नाही. पाकिस्तानने भारतासोबत समान अटींवर क्रिकेट खेळावे, असे आपल्या देशातील जनतेचे मत असल्याचे सेठी यांनी सूचित केले. ते म्हणाले, "भारताविरुद्ध खेळण्यासाठी आमच्या सरकारचे कोणतेही बंधन नाही, परंतु मी देशातील जनतेचा विचार करता असे म्हणू शकतो की आम्ही लाचार नाहीत, आम्ही आर्थिकदृष्ट्या आमच्या पायावर उभे राहू शकतो. आम्हाला भारतासोबत सन्मानजनक क्रिकेट खेळायचे आहे. आमची एसीसीशीही चर्चा सुरू आहे."

### भारत आणि पाकिस्तानमध्ये तीन सामने होणार

**आता जर आपण स्पर्धेच्या स्वरूपाबद्दल बोललो तर यावेळी एकदिवसीय स्वरूपातील आशिया चषक असेल जो सप्टेंबर महिन्यात खेळवला जाऊ शकतो. या वर्षी होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेसाठी ही चांगली तयारी असेल. यावेळीही एकूण ६ संघ सहभागी होणार असून त्यांची ३-३ गटात विभागणी करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असतील जिथे या दोघांमध्ये साखळी फेरीत पहिला सामना खेळला जाईल. यानंतर दोन्ही संघ सुपर ४ मध्ये गेले तर तिथेही भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामना होण्याची शक्यता आहे. यानंतर सुपर ४ मध्ये भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ अव्वल राहिले तर अंतिम फेरीतही दोन कट्टर प्रतिस्पर्ध्यांमध्ये लढत होऊ शकते. आगामी स्पर्धेत एकूण १३ सामने खेळवले जाणार आहेत. आत्तापर्यंत, कोणत्याही प्रकारचे अधिकृत वेळापत्रक आणि ठिकाण तपशीलांची प्रतीक्षा आहे.**